महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ 3 मे 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 304 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# एनएचएम कर्मचाऱ्यांचा १४ मेपासून आमरण उपोषणाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (एनएचएम) राज्यात कार्यरत असलेले ३४ हजार ५०० कर्मचारी मागील चार महिन्यांपासून विनावेतन काम करीत आहेत. राज्य सरकारने जानेवारीपासून वेतन न दिल्याने या कर्मचारी व अधिकाऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. त्यामुळे येत्या १३ मेपर्यंत तातडीने वेतन द्यावे, त्याचबरोबर समायोजन, बदली व वेतनवाढीच्या मागणीचाही विचार करावा अन्यथा १४ मेपासून राज्यभरात टप्प्याटप्प्याने आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा अभियानांतर्गत काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

राज्यामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, फार्मासिस्ट, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, रक्तशुद्धीकरण केंद्रामध्ये काम करणारे तंत्रज्ञ असे ३४ हजार ५०० अधिकारी व कर्मचारी काम करीत आहेत. नागरिकांना अधिक प्रभावीपणे आरोग्य सेवा पुरविणारे हे कर्मचारी व अधिकारी विनावेतन काम करीत आहेत. वेतन न झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असून, अनेक जण मानसिक तणावाखाली आहेत. त्यामुळे राज्यामध्ये ठिकठिकाणी कर्मचारी व अधिकारी काम बंद आंदोलन करीत असून त्यामुळे आरोग्य सेवेवर परिणाम होत आहे.

## असे होणार आंदोलन

**जिल्हाधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांना २ मे रोजी निवेदन देण्यात येणार असून राज्यातील अन्य संघटनांसोबत ३ मे रोजी चर्चा करण्यात येणार आहे. त्यानंतर ४ मे रोजी राज्यस्तरावर सभा, ५ मे रोजी काळ्या फिती लावून सभा व अहवाल सादरीकरणावर बहिष्कार, ६ मे रोजी खासदार, आमदार व मंत्री यांना निवदेन देण्यात येणार, ७ ते १३ दरम्यान सामूहिक रजा आंदोलन, मागण्या मान्य न झाल्यास १४ मेपासून सामूहिक रजा आंदोलन करण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे.**

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

तरीही सरकारने या कर्मचाऱ्यांच्या वेतनाकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे प्रलंबित वेतन, वेतनवाढ, समायोजन व बदली या मागण्यांसाठी एनएचएमच्या कर्मचारी व अधिकारी यांची संघटना असलेल्या 'राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी एकता संघा'ने सरकारला १४ दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. या १४ दिवसांमध्ये विविध माध्यमातून सरकारला मागण्या कळविण्यात येणार आहेत. मात्र त्याकडेही सरकारकडून दुर्लक्ष करण्यात आल्यास १४ मेपासून संघटनेचे अध्यक्ष विजय गायकवाड व अन्य एकजण साताऱ्यामधून आमरण उपोषणाला सुरुवात करणार आहेत. त्यानंतर संपूर्ण राज्यातील अधिकारी व कर्मचारी टप्प्याटप्प्याने उपोषणाला बसणार आहेत.

### एनएचएम कर्मचाऱ्यांची कामे

असंसर्गजन्य आणि संसर्गजन्य आजारांना प्रतिबंध आणि नियंत्रण करणे, बालके आणि महिलांची आरोग्य तपासणी, पोषण, लसीकरण, जननी-शिशु आरोग्य योजना, गरोदर मातांची सेवा, प्रसूती प्रश्चात सेवा, कुटुंब कल्याण सेवा, अत्यावश्यक सेवा यांसारख्या विविध आरोग्य सेवा राष्ट्रीय आरोग्य मिशन कार्यक्रमांतर्गत तळागाळातील नागरिकांना पुरविण्याचे काम हे अधिकारी व कर्मचारी करीत आहेत.

> **आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासोबत झालेल्या बैठकीमध्ये त्यांनी लवकरच प्रलंबित वेतन देण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. मात्र १७ दिवस उलटले तरी अद्याप वेतन मिळालेले नाही. त्यामुळे आंदोलनाशिवाय पर्याय नाही. मागण्यांबाबत लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाही.**
>
> – विजय गायकवाड, अध्यक्ष, राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी एकता संघ

# ठाणे जिल्ह्यात तब्बल सोळा माध्यमिक शाळा अनधिकृत

## शिक्षण विभागाकडून अनिधकृत शाळांची यादी प्रसिद्ध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे:** जिल्ह्यात शासन परवानगीशिवाय काही अनधिकृत शाळा सुरु असल्याचे शिक्षण विभागाच्या निदर्शनास आले आहे. पालकांची आणि विद्यार्थ्यांची फसवणूक करणाऱ्या अश्या शाळांची यादी शिक्षण विभागाने जाहीर केली असून, पालकांनी विद्यार्थ्यांचे शाळा प्रवेश घेताना खात्री करून शासनमान्य शाळांमध्येच प्रवेश घ्यावा असे आवाहन माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांनी केले आहे. जिल्ह्यात खासगी व्यवस्थापनाद्वारे चालवण्यात येणाऱ्या शाळांपैकी १६ माध्यमिक शाळा अनधिकृत असल्याचे समोर आले आहे. या अनधिकृत शाळांमुळे विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात आले आहे. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात १५ शाळा अनधिकृतपणे सुरु आहेत. या शाळांमधून राज्य शिक्षण मंडळ, सीबीएसई, आयसीएसई, आयबी इत्यादी नामांकित मंडळांच्या नावाखाली आकर्षक जाहिराती करण्यात येत असून त्यामुळे पालकांची फसवणूक होण्याचा धोका वाढला आहे. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ अंतर्गत अनधिकृत शाळांवर दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई करण्यात येत आहे.

ठाणे जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात एकही अनधिकृत शाळा सुरु राहणार नाही यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. असे जिल्हा परिषद प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.
- शिक्षण विभागाकडून पालकांना आवाहनया शाळांकडे माध्यमिक शिक्षणासाठी आवश्यक शासकीय मान्यता उपलब्ध नाही. त्यामुळे या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देणे अनुचित असून, भविष्यातील शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पालकांनी सजग राहावे.

शासनमान्य शाळांची यादी संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. पालकांनी कोणत्याही प्रवेशापूर्वी अधिकृत शाळांची माहिती तपासून निर्णय घ्यावा, असे आवाहन ठाणे जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाकडून करण्यात येत आहे.


> **ठाणे जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागात काही शाळा शासनाची आवश्यक मान्यता न घेता अनधिकृतरीत्या शिक्षण संस्था चालवत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पालकांनी प्रवेश घेण्यापूर्वी संबंधित शाळेची मान्यता व नोंदणी क्रमांक तपासावा**
>
> - ललिता दहितुले
> शिक्षणाधिकारी
> शिक्षण विभाग (माध्यमिक)

### ठाणे जिल्ह्यातील माध्यमिक अनधिकृत शाळांची यादी

१. आर.एन.इंग्लिश स्कुल, सर्वे क्र.116/16,17 मौजे कोनगाव, ता.भिवडी, जि.ठाणे
२. इंग्लिश प्रायमरी माध्यमिक उच्च माध्यमिक स्कुल नवी वस्ती टेमघर ता.भिवंडी
३. फकिह इंग्लिश स्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज, म्युनिसिपल हाऊस क्र.1008/0, न्यु गौरीपाडा, भिवंडी, जि.ठाणे
४. एस.एस.इंडिया हायस्कुल दिवा (पुर्व)
५. श्री. विदया ज्योती स्कूल, डावले, ठाणे
६. केम्ब्रीज इंग्लिश स्कूल, मानसी कॉम्प्लेक्स भोलेनाथ मुंब्रादेवी कॉलनी रोड मुंब्रा जि.ठाणे
७. एस.एस. इंग्लिश हायस्कूल, ईश्वरपार्क, मुंब्रादेवी मेडीकल जवळ, मुंब्रादेवी रोड, दिवा (पूर्व)
८. ओमसाई इंग्लिश स्कुल, दातिवली रोड दिवा जि.ठाणे
९. पी.टी.आर.एस.डी.इंग्लिश स्कुल सर्व्हे नं. 56 बल्याणी टिटवाळा ता.कल्याण
१०. चेतना हिंदी विद्यामंदिर, कल्याण (पू.), चक्की नाका, हाजी मलंग रोड, कल्याण (पू.), जि.ठाणे
११. ओम साई इंग्लिश स्कुल पिसवली
१२. रेनबो इंटरनॅशनल स्कूल, कॉसमॉस आर्केड, फेज-४, टीएमसी वॉटरटँकजवळ, ब्रम्हानंद, ठाणे
१३. शारदा इंग्रजी माध्यमिक शाळा
१४. डी.आर.पाटील इंग्लिश मेडियम स्कुल तुर्भे नवी मुंबई
१५. अल मुनीहाज सेकंडरी हायस्कुल, बेलापूर, नवी मुंबई
१६. ओईएस इंटरनॅशनल स्कुल सेक्टर 12 वाशी नवी मुंबई

# उल्हास नदी विषारी करणाऱ्या सांडपाण्याची होणार तपासणी

## प्रदूषण मंडळाने घेतले ७० ठिकाणचे नमुने



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगरः** उल्हास नदीतील जलपर्णी काढण्याच्या निमित्ताने सक्रीय झालेल्या महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने आता उल्हास आणि वालधुनी नदीच्या पात्रात मिसळणाऱ्या सांडपाण्याची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी बदलापूर, अंबरनाथ, उल्हासनगर आणि कल्याण शहरातील नाल्यांमधील सुमारे ७० नमुने घेण्यात आले आहेत. या सांडपाण्यामध्ये नेमके कोणते घटक आहेत हे तपासले जाणार आहेत.

ठाणे जिल्ह्याची जीवनवाहिनी असलेली उल्हास नदी दरवर्षी जलपर्णीने व्यापली जाते. नदीच्या पात्रावर जलपर्णीचे मोठे आच्छादन पाहायला मिळते. तर उल्हासनगर शहरातून वाहणारी वालधुनी नदी प्रदुषणामुळे गटारगंगा झाली आहे. त्यामुळे दोन्ही नद्यांची अवस्था बिकट आहे. या दोन्ही नद्यांच्या संवर्धनासाठी पर्यावरणप्रेमी सातत्याने आंदोलन करून प्रदुषण प्रशासनाच्या निदर्शनास आणून देतात. मात्र शासकीय उदासिनतेमुळे उल्हास नदी गटारगंगा होण्याचा वाटेवर आहे. त्यामुळे नागरिक आणि पर्यावरणप्रेमींच्या रेट्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींसह शासकीय यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या आहेत.

बदलापूर ते कल्याण या पट्ट्यात उल्हास नदीत विविध ठिकाणी नाल्यांच्या माध्यमातून सांडपाणी नदीत मिसळते आहे. दररोज लाखो लीटर सांडपाणी हे नदीत मिसळत असून त्यावर कोणतीही प्रक्रिया केली जात नाही.

बदलापुरातल्या नाल्यांमधून रासायनिक सांडपाणी उल्हास नदीत मिसळत असल्याची बाब काही दिवसांपूर्वी पर्यावरणप्रेमी शशिकांत दायमा यांनी निदर्शनास आणून दिली होती. तर नागरी सांडपाणीही ठिकठिकाणी मिसळते आहे. ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनीही ग्रामीण भागातील अशा नाल्यांची पाहणी केली होती.

# कल्याण तहसील कार्यालय झाले चकाचक

## नागरिकांच्या पायाभूत सुविधांसाठी स्वतंत्र कक्षाची निर्मिती




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण तहसील कार्यालय इमारत कालची आणि आजची स्थिती बघितली तर तहसीलदार सचिन शेजल यांनी या जुन्या इमारतीत अमूलाग्र बदल करून कल्याण तशीलदार कार्यलयचा पूर्ण लूक बदलवला आहे. संपूर्ण इमारत चकाचक करत येथे कामा निमित्त येणाऱ्या नागरिकांना सुबीधा उपलब्ध करून दिल्या आहेत. विशेष म्हणजे एका क्लिक वर येथे नागरिक त्यांना हव्या त्या शासकीय योजनाची माहिती घेऊ शकणार आहेत. पूर्वी चे तहसील आणि आजचे तहसील कार्यालय यात सुधारणाच्या रूपात खूप सुंदर बदल केले असून येथील प्रत्येक विभाग आता सुटसुटीत झालेला आहे.

तहसीलदार सचिन शेजल यांनी आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते येथील नागरिकांसाठी सोयी सुविधा केंद्रा चे उदघाट्न नुकताच केले यावेळी प्रांत अधिकारी गुजर साहेब उपस्थित होते. नवीन तहसील कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला त्याच्या कामा सोबत समाधान लाभेल अशा प्रकारची व्यवस्था उभारण्यात आलेल्या आहेत. त्याच बरोबर येथील दप्तर (रेकॉड) आद्यायावत ठेवण्यासाठी ही प्रयत्न केले आहेत. या इमारतीची पाहणी आमदार किसन कथोरे प्रांत अधिकारी विश्वास गुजर यांनी केली त्यांनी तहसीलदारांच्या या कामाचे कौतुक केले.

# आमदार किसन कथोरेंच्या हस्ते मागासवर्गीय लाभार्थ्यांना साहित्य वाटप





दै. ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड-प्रतिनिधी

सन 2024 -25 या वर्षातील 20% जिल्हा परिषद सेसफंड अंतर्गत मागासवर्गीय वस्तीसाठी व मागासवर्गीय लाभार्थ्यांना विविध साहित्याचे वाटप मुरबाड पंचायत समिती येथिल सभागृहात मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते आज करण्यात आले.

यामध्ये भजनासाठी 6 वाद्यवृंद साहित्य, 19 समाजमंदिराना भांडी, 10 डिजे संच व 6 समाजमंदिरांना सतरंज्या अशा प्रकारचे साहित्य वाटप आज करण्यात आले.मागिल वर्षी काही तांत्रिक कारणामुळे सेस फंडाचा लाभ तालुक्यातील नागरिकांना मिळाला नाही. परंतु या वर्षी चांगल्या प्रकारे लाभ मिळाला असल्याचे आमदार कथोरे यांनी मार्गदर्शन करताना म्हटले.

भजन किंवा डि.जे. संचातून काही लोकांना रोजगार मिळू शकतो.साहित्याची योग्य निगा राखा तालुक्यात अनेक लहान मुलांना गायनाची व वादनाची आवड आहे, संगित शिकत आहेत. वादक व गायनासाठी लवकरच तालुक्याला संगित कला भवन उभारण्याचा आपला मानस आहे.महाराष्ट्राचा आवाज महेश कंटे यांच्या मार्गदर्शनाखाली हे भवन राहणार असल्याचे आमदार कथोरे यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी लता गायकवाड यांनी केले.तर या कार्यक्रमासाठी नितीन मोहपे, दिपक पवार, सुरेश बांगर,स्वरा चौधरी, जितेंद्र भावार्थे, अनिल घरत, दिनेश ऊघडे, जयवंत कराळे, सचिन चौधरी, संजय पवार, मयुर एगडे, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी, कर्मचारी यांच्यासह मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते.





# रुंदे आंबिवली ग्रामपंचायत उपसरपंच पदी मानिक चौधरी यांची बिनविरोध निवड



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** रुंदे आंबिवली ग्रामपंचायत उपसरपंच पदि मानिक चौधरी याची बिनविरोध निवड झाली आहे. कल्याण तालुक्यातील रुंदे-आंबिवली ग्रामपंचायत एकुण आठ सदस्य आहेत.

उपसरपंच पदा साठी मानिक चौधरी यांनी अर्ज दाखल केला होता, सभा अध्यक्ष तथा सरपंच नरेश चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक घेण्यात आली यावेळी सदस्य नरेश चौधरी, माणिक चौधरी, रेणुका चौधरी, वैशाली चौधरी, गुरुनाथ फसाले,महेश देसले इत्यादी उपस्थित होते, ग्रामसेवक डि सी भेरे यांनी अर्जाची छननी करुन वैध असल्याचे सांगितले,उपसरपंच पदासाठी मानिक चौधरी याचा एकमेव अर्ज आल्याने सभा अध्यक्ष तथा सरपंच नरेश चौधरी यांनी उपसरपंच पदि मानिक चौधरी याची निवड जाहीर केली, फटाक्यांच्या अतिशबाजीने जोरदार स्वागत केले,

नवनिर्वाचित उपसरपंच मानिक चौधरी यांना शुभेच्छा देण्यासाठी भाजप जिल्हा उपाध्यक्ष राजाराम चौधरी,बाजार समितीचे संचालक रवींद्र घोडविंदे, योगेश धुमाळ, भाजपचे कल्याण तालुका अध्यक्ष शेखर लोणे,सरपंच नरेश चौधरी, माजी उपसरपंच महेश देसले,राष्ट्रवादीचे माजी तालुका अध्यक्ष चंद्रकांत गायकर,माजी सरपंच विलास चौधरी,, रवींद्र जाधव, चंद्रकांत भोईर,गणेश भोईर ,गणेश चौधरी, गुरुनाथ देसले, माजी पोलीस पाटील सोनु चौधरी, बाळाराम चौधरी प्रभाकर चौधरी, शंकर चौधरी, गणेश बनकरे,,यांच्या सह आदि उपस्थित होते,



## गीतासार



### अध्याय १०
### विभूतियोगः

महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा । मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः ॥ १०-६ ॥

सात महर्षी, त्यांच्याही पूर्वी असणारे चार सनकादिक, तसेच स्वायंभुव इत्यादी चौदा मनू हे माझ्या ठिकाणी भाव असलेले सर्वच माझ्या संकल्पाने उत्पन्न झाले आहेत. या जगातील सर्व प्रजा त्यांचीच आहे. ॥ १०-६ ॥

एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः । सोऽविकम्पेन योगेन युज्यते नात्र संशयः ॥ १०-७ ॥

जो पुरुष माझ्या या परमैश्वर्यरूप विभूतीला आणि योगशक्तीला तत्त्वतः जाणतो, तो स्थिर भक्तियोगाने युक्त होतो, यात मुळीच शंका नाही. ॥ १०-७ ॥

अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते । इति मत्वा भजन्ते मां बुधा भावसमन्विताः ॥ १०-८ ॥

मी वासुदेवच सर्व जगाच्या उत्पत्तीचे कारण आहे आणि माझ्यामुळेच सर्व जग क्रियाशील होत आहे, असे जाणून श्रद्धा व भक्ती यांनी युक्त असलेले बुद्धिमान भक्त मज परमेश्वराला नेहमी भजतात. ॥ १०-८ ॥


मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयन्तः परस्परम् । कथयन्तश्च मां नित्यं तुष्यन्ति च रमन्ति च ॥ १०-९ ॥

निरंतर माझ्यात मन लावणारे आणि माझ्यातच प्राणांना अर्पण करणारे माझे भक्तजन माझ्या भक्तीच्या चर्चेने परस्परांत माझ्या प्रभावाचा बोध करीत तसेच गुण व प्रभावासह माझे कीर्तन करीत निरंतर संतुष्ट होतात आणि मज वासुदेवातच नेहमी रममाण होत असतात. ॥ १०-९ ॥

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् । ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते ॥ १०-१० ॥

त्या नेहमी माझे ध्यान वगैरेमध्ये मग्न झालेल्या आणि प्रेमाने भजणाऱ्या भक्तांना मी तो तत्त्वज्ञानरूप योग देतो, ज्यामुळे ते मलाच प्राप्त होतात. ॥ १०-१० ॥

## रेसिपी
### सोया नगेट्स



साहित्य - सोयाबीनचे तुकडे - 2 कप,गरम पाणी -,रवा - 2 चमचे,बेसन - 2 चमचे,आले-लसूण पेस्ट - 2 चमचा,हिरवी मिरची - 3,कोथिंबीर,हळद - 1 चमचा,गरम मसाला - अर्धा चमचा मीठ,तेल

कृती - सोयाबीनचे तुकडे गरम पाण्यात 15 ते 20 मिनिटे भिजवून घ्यावेत.यानंतर सोयाबीनमधील पाणी गाळून घ्या आणि सोयाबीनचे तुकडे मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्यावेत.वाटलेल्या सोयाबीनमध्ये रवा, बेसन, आले-लसूण पेस्ट, हिरवी मिरची, कोथिंबीर, हळद, गरम मसाला आणि चवीपूरते मीठ टाकून एकजीव करा.मिश्रण तयार झाल्यावर त्याचे छोटे छोटे गोळे तयार करावेत.कढईत तेल गरम झाल्यावर त्या नगेट्स लालसर होईपर्यत तळून घ्यावेत.नगेट्स तुम्ही हव्या त्या आकारात बनवू शकता.अशा पद्धतीने गरमागरम सोया नगेट्स टोमॅटो सॉससोबत सर्व्ह करावेत.

# फळांचा राजा : आंबा



भारतातील फळांचा राजा म्हणून ओळखले जाणारा आंबा केवळ स्वादिष्टच नाही तर उन्हाळ्यातील सर्वात लोकप्रिय फळ देखील आहे. हे फळ भारताची ओळख आणि अभिमान आहे. आंब्याचे नाव ऐकताच लहान मुले, वृद्ध आणि तरुण सर्वांच्या तोंडाला पाणी सुटते. भारत हा आंब्याचा सर्वात मोठा उत्पादक देश आहे आणि तो आपल्या संस्कृती आणि परंपरेशी देखील जोडलेला आहे. अल्फोन्सो, दसरी, केसर आणि तोतापुरी सारख्या आंब्यांच्या अनेक जाती खूप प्रसिद्ध आहेत. आंबा खाल्ल्याने शरीराला अनेक फायदे होतात, जसे की रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे आणि पचन सुधारणे. आंब्यापासून आंब्याचा रस, आइस्क्रीम, लोणचे, जाम इत्यादी अनेक स्वादिष्ट पदार्थ बनवले जातात.

आंब्याचा इतिहास आणि महत्त्व

भारतात आंब्याचा इतिहास सुमारे ४,००० वर्ष जुना असल्याचे मानले जाते. संस्कृतमध्ये याला आम्र म्हणतात आणि भारतीय संस्कृती, धर्म आणि साहित्यात त्याचे विशेष स्थान आहे. प्राचीन ग्रंथांमध्ये आंब्याचा उल्लेख अनेक वेळा आला आहे. आंबा हे फक्त एक फळ नाही, त्याची पाने पूजेसाठी वापरली जातात, लाकडाचा वापर फर्निचरसाठी केला जातो आणि बिया औषधी उद्देशाने वापरल्या जातात. आंबा हा भारताच्या शेती, परंपरा आणि खाद्यसंस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग राहिला आहे आणि आजही तो लोकप्रिय आहे.

आंब्याच्या जाती - आपल्या भारतात आंब्याच्या अनेक प्रसिद्ध आणि स्वादिष्ट जाती आढळतात. यापैकी, अल्फोन्सो हा महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध आंबा आहे, जो त्याच्या सुगंध आणि गोडव्यासाठी आवडतो. लंगडा ही उत्तर प्रदेशातील एक खास जात आहे, ज्याची पोत मऊ आहे आणि चवीला अप्रतिम आहे. दसरी उत्तर भारतातही खूप प्रसिद्ध आहे, तर चौसा आंबा उत्तर भारतात आणि विशेषतः बिहारमध्ये लोकप्रिय आहे. बदामी आंबा कर्नाटकात आढळतो आणि केशर आंबा ही गुजरातची खास ओळख आहे. प्रत्येक प्रकार चव, रंग आणि वासाचा एक अनोखा अनुभव देतो.

आंब्याचे फायदे - आंबा केवळ आपले मन आनंदी करत नाही तर आपले शारीरिक आरोग्य सुधारण्यास देखील मदत करतो. आंब्यामध्ये व्हिटॅमिन ए, सी आणि आय आढळतात. हा आंबा आपली रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्याचे काम करतो. हे पचनसंस्था निरोगी ठेवण्याचे काम देखील करते. आंबा खाल्ल्याने त्वचा सुधारते आणि मुलांसाठी ते उर्जेचा एक स्वादिष्ट स्रोत देखील आहे.

आंब्यापासून बनवलेले पदार्थ - आंबा खाण्याव्यतिरिक्त, आपण त्यापासून अनेक प्रकारच्या गोष्टी बनवू शकतो. आंब्यापासून अनेक स्वादिष्ट आणि लोकप्रिय उत्पादने बनवली जातात जी सर्व वयोगटातील लोकांना आवडतात. कच्च्या आंब्यापासून बनवलेले लोणचे तिखट आणि मसालेदार असते जे जेवणाची चव वाढवते. उन्हाळ्यात कैरीची चटणी थंडावा देते आणि जेवणासोबत मोठ्या प्रमाणात वापरली जाते. आंब्याचा रस बनवला जातो जो ताजेपणा आणि उर्जेने परिपूर्ण असतो. तर कैरीचे पन्हे उन्हाळ्यात जीवाला थंड करण्यास मदत करतं. आंबा कुल्फी आणि आईस्क्रीम हे उन्हाळ्यातील आवडत्या गोड पदार्थांपैकी एक आहे.

निष्कर्ष - आंबा हे केवळ एक स्वादिष्ट फळ नाही तर ते भारताच्या समृद्ध कृषी संस्कृती आणि परंपरेचे प्रतीक आहे. उन्हाळ्यात आंब्याचा आस्वाद घ्यायला सर्वांनाच आवडते. त्याची चव आणि उपयुक्तता त्याला फळांचा राजा बनवते. भारतासारख्या देशाला आंब्यासारखे फळ मिळाले आहे याचा आम्हाला अभिमान आहे.

# जीप चालकाचा प्रामाणिकपणा
## दागिन्यांची सापडलेली पिशवी केली परत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : आजच्या या स्वार्थी आणि मतलबी जगात लोक पैसै व दागिन्यांसाठी वेळेला दुसर्याचा जीवही घ्यायला मागे पुढे पाहत नाही.परंतु आज प्रामाणिक असणारे लोकही भरपूर आहेत.जे आपल्या कष्टाचे नाही दुसर्याचे आहे त्यावर आपला अधिकार नाही ही उद्दात भावना त्यांच्या ठाई असते.त्यांच्यावर त्यांच्या आईवडिलांनी चांगले संस्कार पेरलेले असतात. त्याचे उत्तम उदाहरण मुरबाड मध्ये पाहावयास मिळत आहे. वैशाखरे गावचे सुपुत्र श्री. प्रकाश डोहळे हे गाडी चालवून आपला उदरनिर्वाह करत आहेत. एक दोन दिवसापूर्वी त्यांच्या गाडीतून प्रवास करणारी तळवली (बारागाव) गावची महिला आपल्या दागिन्यांची पिशवी त्यांच्या गाडीत विसरली . परंतु प्रकाश भाऊंच्या ही गोष्ट लक्षात आल्यावर त्यांनी सदर दागिने त्या महिलेचा शोध घेऊन प्रामाणिकपणे परत केले आहेत. प्रकाशभाऊ आपल्या प्रामाणिकपणाला सलाम.

# सनातन संस्थेच्या माध्यमातून राष्ट्र शंखनाद महोत्सव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सनातन संस्थेच्या माध्यमातून गेली २५ वर्षे अविरतपणे हिंदु राष्ट्रासाठी जागरण करत असलेले डॉ. जयंत आठवले यांचे कार्य अलौकिक आणि अत्यंत विलक्षण आहे. त्यांच्या ८३ व्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने गोवा येथे १७ ते १९ मे २०२५ या कालावधीत 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. हा केवळ महोत्सव नसून भारताला पुन्हा तेजस्वी, समर्थ बनवण्याचा आणि सनातन धर्माची पुनर्स्थापना करण्याचा जागर आहे, असे गौरवोद्गार 'श्रीरामजन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासा'चे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरि यांनी महोत्सवासाठी पाठवलेल्या शुभसंदेशात काढले आहेत.

ते पुढे म्हणाले की, 'सनातन संस्था'च्या माध्यमातून गेल्या २५ वर्षांपूर्वी सुरू केलेल्या कार्याची फलश्रुती म्हणून आज हजारोंच्या संख्येने समर्पित कार्यकर्ते स्थानस्थानावर जाऊन निष्काम भावनेने व स्वयंशिस्तीने सनातन धर्माचा प्रसार करत आहेत. या कार्यकर्त्यांनी स्वतःच्या जीवनाचा स्वाध्याययज्ञ, सेवायज्ञ आणि लोकजागरणयज्ञ सुरू केला आहे. हे कार्य अत्यंत विलक्षण आहे आणि त्यातूनच सनातन राष्ट्राच्या अभ्युदयाचा मार्ग उजळणार आहे.

या महोत्सवात विविध राष्ट्रनिष्ठ नेते, धर्माचार्य, कार्यकर्ते आणि सनातनप्रेमी एकत्र येऊन विचारमंथन करणार आहेत. या मंथनातून केवळ नवनीत नव्हे, तर अमृत उदयाला येईल आणि याच अमृतकलशातून सनातन राष्ट्राला नवतेज प्राप्त होईल. आज भारताला समर्थ राष्ट्र बनवायचे असेल, तर सनातन धर्माच्या मूलभूत तत्त्वांची पुनःस्थापना करणे अत्यावश्यक आहे; कारण भारताच्या सामर्थ्यावरच जगात समता, बंधुता आणि खरी स्वतंत्रता टिकू शकते. म्हणूनच हे कार्य एखाद्या व्यक्तीचे किंवा एखाद्या संस्थेचे नसून, धर्माचे आणि राष्ट्राचे कार्य आहे. आणि म्हणूनच हे प्रत्यक्ष भगवानाचे कार्य आहे.

त्यामुळे सर्व धर्मप्रेमी, राष्ट्रनिष्ठ कार्यकर्त्यांनी, नेत्यांनी, धर्मगुरूंनी आणि सामान्य भक्तांनी या महोत्सवात सहभागी होऊन आपल्या श्रद्धेचे आणि सेवाभावाचे योगदान द्यावे. सनातन धर्माची मूळ अधिक बळकट करण्यासाठी आणि भारताच्या सुंदर, समृद्ध भविष्यासाठी हा महोत्सव एक सुवर्णसंधी आहे. या महामंथनातून मिळणाऱ्या तेजाने भारत गगनभरारी घेईल आणि सनातन धर्माचा दिव्य प्रकाश संपूर्ण जगात पसरेल. म्हणून आपण सर्वांनी एकत्र येऊन या दिव्य कार्यात सहभागी होऊया आणि भारताला त्याच्या सनातन तेजाने पुन्हा उभे करूया, असेही आवाहन त्यांनी शेवटी केले आहे.

# नोकरी मागणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे बना
## - डॉ. विजय सूर्यवंशी(विभागीय आयुक्त,कोकण विभाग)





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : उद्योग संचालनालय– महाराष्ट्र शासन अंतर्गत कार्यरत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, मुंबई आयोजित विभागीय प्रशिक्षण आयोजक कार्यकमाचा उद्घाटन सोहळा काल दि.२९ एप्रिल २०२५ रोजी विभागीय आयुक्त कोकण भवन समिती सभागृहात संपन्न झाला.यामधे मुंबई, ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यातील युवक युवती सहभागी झाले होते.

या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून माननीय विभागीय आयुक्त कोकण विभाग आदरणीय डॉ.विजय सूर्यवंशी यांची मुख्य उपस्थिती होती त्यांच्या हस्ते कार्यक्रमाची उद्घाटन झाले तसेच प्रमुख पाहुने म्हणून श्रीमती संजीवनी जाधव सहाय्यक संचालक विभागीय माहिती कार्यालय कोकण विभाग यांची उपस्थिती होती.

श्री दत्तात्रय थावरे,विभागीय अधिकारी एम.सी. ई.डी.मुंबई यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करून एम.सी. ई .डी. संस्थेची संपूर्ण माहिती थोडक्यात दिली तथा कार्यक्रमाच्या मुख्य उद्देश सांगितला .उद्योजकता विकासामध्ये सदरील प्रशिक्षण किती महत्त्वपूर्ण आहे त्याबद्दल सादरीकरण केले.

श्रीमती संजीवनी जाधव सहायक संचालक विभागीय माहिती कार्यालय कोकण विभाग यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा देताना सांगितले की महिलावर्ग उद्योजकता विकासामध्ये इतक्या पुढाकाराने काम करतोय खरंच अभिमानाची बाब आहे. अध्यक्षीय भाषणामध्ये माननीय श्री. डॉ.विजय सूर्यवंशी साहेब यांनी आपल्या माध्यमातून हे प्रशिक्षणा पूर्ण करून किमान 50 उद्योजक तयार करण्याचा विचार करा आणि पुन्हा सहा महिन्यांमध्ये भेटून मला कळवा. तसेच शाळा कॉलेजेस आयटीआय यामध्ये जाऊन उद्योजकता विकासाचे काम पोहोचवा असेही आव्हान केले.कोकण विभागामध्ये असणाऱ्या विविध उद्योग संधी त्याबद्दल थोडक्यात आढावा देऊन सर्वांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. श्री सुबोध सिंग बायस प्रकल्प अधिकारी ठाणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तथा कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. प्रदीप सावंत प्रकल्प अधिकारी एम. सी. ई डी.मुंबई यांनी केले. यावेळी श्री धम्मपाल थोरात प्रकल्प अधिकारी एम.सी. ई.डी. पालघर उपस्थित होते.

# पारंपारिक माध्यमे व डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे माध्यम विश्वास क्रांतिकारी बदल



## - गॅझप्रोम मीडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : पारंपरिक प्रसारमाध्यमे आणि डिजिटल प्लॅटफॉर्म्स यांच्या एकत्रीकरणामुळे माध्यम जगतात क्रांतिकारक बदल घडून येत असून यामुळे सशक्त 'माध्यम इकोसिस्टम' तयार होत आहे, असे प्रतिपादन गॅझप्रोम मीडिया होल्डिंगचे मुख्य कार्यकारी अधिकारी अलेक्झांडर झारोव्ह यांनी केले.

वर्ल्ड जिओ सेंटरमध्ये सुरू असलेल्या भारताच्या पहिल्या जागतिक ऑडिओ-व्हिज्युअल आणि मनोरंजन (WEAVES) शिखर परिषदेच्या दुसऱ्या दिवशी 'माध्यम सामग्रीच्या एकत्रित शक्ती' या विषयावर आयोजित विशेष सत्रात ते बोलत होते.

श्री. झारोव्ह म्हणाले, भारत-रशिया सहनिर्मितीचा 'द लिट्ल किंग ऑफ माय हार्ट' हा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार असून, त्याचे चित्रीकरण मुंबई आणि जोधपूर येथील ऐतिहासिक स्थळांवर करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या चित्रपटात भारतीय कलाकारांनी रशियन कलाकारांसोबत एकत्रित काम केले आहे. यामध्ये भारतीय सिनेमातील भावनात्मक शैली आणि रशियन विनोद यांचा सुरेख संगम या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. भारत आणि रशिया या दोन्ही प्राचीन आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरांचा वारसा लाभलेले देश आहेत. या चित्रपटाच्या निर्मितीत दोन्ही देशांमधील कलावंत एकमेकांच्या संस्कृती समजून घेऊन काम करत होते,असेही झारोव्ह यांनी यावेळी नमूद केले.

तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही या उपक्रमाचे कौतुक केले आहे, असेही यावेळी त्यांनी सांगितले. चित्रपटाच्या प्रसिद्धीसाठी सोशल मीडियावरील ब्लॉगर आणि कंटेंट क्रिएटर्सनी मोलाची भूमिका बजावली आहे. या माध्यमातून दोन्ही देशांमधील मैत्री आणि सांस्कृतिक संबध अधिक दृढ होणार असल्याचा विश्वास श्री.झारोव्ह यांनी यावेळी व्यक्त केला.

# विद्यार्थ्यांनी लुटला प्रत्यक्ष स्टेडिअमवर क्रिकेट सामना बघण्याचा अनुभव



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाप्रमाणेच त्यांच्या सर्वांगीण विकासावर नवी मुंबई महानगरपालिकेचे डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर, रबाळे येथील पीएम राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय आघाडीवर राहिले आहे. अशाच प्रकारचा एक वेगळा उपक्रम या नमुंमपा शाळा क्र. 55 मधील 450 हून अधिक विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात आला असून या विद्यार्थ्यांनी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर जाऊन आयपीएल मॅचचा अनुभव घेतला.

'क्राय' या संस्थेच्या सहयोगाने, माजी महापौर श्री.सुधाकर सोनवणे यांच्या पुढाकारातून, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष स्टेडियममध्ये जाऊन आयपीएल क्रिकेट सामना अनुभवण्याचा आनंद घेता आला असून शिक्षण विभागाच्या उपआयुक्त श्रीम. संघरत्ना खिल्लारे, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. स्नेहल विशे यांनीही याकामी महत्वाची भूमिका बजावलेली आहे.

बहुतांशी कष्टकरी कामगार वर्गातील पालकांची मुले पीएम राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालयात शिकत असून त्यांनी स्टेडियमध्ये जाऊन प्रत्यक्ष क्रिकेट सामना बघण्याचा अनुभव पहिल्यांदाच घेता आला. त्यातही विशेष बाब म्हणजे मुंबई इंडियन्स टीमच्या प्रमुख श्रीम.निता अंबानी यांच्या समवेत जगप्रसिध्द क्रिकेट समालोचक श्री.हर्ष भोगले यांच्यासह हा सामना बघण्याचा आनंद विद्यार्थ्यांनी मनमुराद लुटला. ही संधी उपलब्ध झाल्याचा आनंद विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या चेह-यावर ओसंडून वाहत होता.

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION
B.Sc Data Science
B.Sc IT
B.Sc Chemistry Maths
BMS
BAF
B.Com
BAMMC
B.A.
POST GRADUATION
M.Sc IT
M.Sc Chemistry
M.Com Advanced Accountancy
MAMMC
M.A. Marathi
M.A. Economics
M.A. History
M.A. Sociology
M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज, हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन ("B"Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2025-2026
BAMMC
MASS MEDIA
M.A. C&J
COMMUNICATION & JOURNALISM
Look forward to a
BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

# संदीप गीते उत्कृष्ट सेवेसाठी पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : महाराष्ट्र पोलीस दलातील ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील मुरबाड पोलीस ठाणे येथे कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक संदीप गीते यांना त्यांच्या उल्लेखनीय आणि गुणवत्तापूर्ण सेवेसाठी प्रतिष्ठित पोलीस महासंचालक पदक जाहीर करण्यात आले आहे.

त्यांच्या कर्तव्यदक्षता, आणि उत्कृष्ट कार्यामुळे पोलीस दलाची मान उंचावली आहे. महाराष्ट्र दिन१ मे, २०२५ रोजी ठाणे येथे आयोजित विशेष समारंभात ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ .डी. एस. स्वामी यांच्या शुभहस्ते हे पदक प्रदान करण्यात आले. पोलीस निरीक्षक संदीप गीते यांनी वेगवेगळ्या पोलीस ठाणे कार्यरत असताना खून दरोडा, जबरी चोरी यासारख्या गंभीर गुन्ह्यांचा छडा लावणे, तसेच महत्त्वाच्या गंभीर गुन्हे मधील सराईत आरोपींना पकडणे कायदा व सुव्यवस्था राखणे करिता मोलाचे योगदान दिले आहे. त्यामुळे त्यांना महाराष्ट्र दिनाच्या दिवशी महासंचालक पदकाने सन्मानित करण्यात आले आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# भागशाळा मैदानात शहीद स्मारक उभारा –आमदार रविंद्र चव्हाण



## केडीएमसी आयुक्तांना पत्र पाठवत निधी उपलब्ध असल्याचीही दिली माहिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात डोंबिवलीतील अतुल मोने, संजय लेले, हेमंत जोशी या तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या तिघांच्या आठवणीसाठी डोंबिवलीमध्ये स्मृतीस्थळ उभारण्याची मागणी भाजपचे कार्यकारी अध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्तांना पत्र पाठवून या शहीद स्मारकासाठी आपल्याकडे निधीही उपलब्ध असल्याचे सांगितले आहे.

जम्मू-काश्मीर येथील पहलगाममध्ये काही दिवसांपूर्वी झालेल्या दहशतवादी हल्ल्यामध्ये २७ पर्यटकांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये महाराष्ट्रातील ६ जणांचा समावेश होता. यामधील तिघे जण डोंबिवलीतील होते. एकाच कुटुंबाशी निगडीत असलेल्या या तिघांची दहशतवाद्यांनी अमानुषपणे गोळ्या झाडून हत्या केली. या घटनेनंतर संपूर्ण कल्याण डोंबिवली शहरावर शोककळा पसरली आहे. मात्र, या दुःखद प्रसंगाला ही तीनही कुटुंबे अत्यंत धीरोदात्तपणे सामोरे गेले असून या घृणास्पद आणि अमानवी घटनेविरोधात डोंबिवलीकर नागरिकांच्या भावना अतिशय तीव्र आहेत.

या घटनेत प्राण गमावलेल्या परिवाराशी प्रत्येक डोंबिवलीकर नागरिकाचे भावनिक बंध जुळले आहेत. देशासाठी या तीन डोंबिवलीकरांनी बलिदान दिल्याची लोकभावना व्यक्त झाली. आणि त्यातूनच मग भागशाळा मैदानात या तिघांच्या पार्थिवाचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी हजारो डोंबिवलीकरांनी गर्दी केल्याचे रविंद्र चव्हाण यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे.

तसेच या लोकभावनेचा विचार करता हेमंत जोशी, संजय लेले, अतुल मोने या डोंबिवलीकरांची स्मृती भागशाळा मैदान येथे जपावी म्हणून स्मृतिस्थळ कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने उभारावे ही समस्त डोंबिवलीकरांच्या वतीने मागणी असल्याचेही चव्हाण यांनी यावेळी स्पष्ट केले. तर याबाबत प्रशासकीय मंजुरी तात्काळ देऊन कार्यवाही करावी, या कामाकरिता रु. १.२५ कोटी इतका भागशाळा मैदान सुधारणा निधी माझ्याकडे उपलब्ध असून त्याचा या स्मृतिस्थळासाठी विनियोग करता येईल असेही त्यांनी आपल्या पत्रात नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर स्मृतिस्थळ उभारण्याविषयी तात्काळ कार्यवाही करून कै. हेमंत जोशी, कै. संजय लेले, कै. अतुल मोने या डोंबिवलीकरांच्या बलिदानाचा यथोचित गौरव व्हावा अशी भावना रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केली आहे.

# पालकांसाठी सुट्टीचा गृहपाठ

## ज.प.भुवन शाळेचा अनोखा उपक्रम !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड -प्रतिनिधी

१ मे २०२५ सर्व शाळांचा वार्षिक निकाल जाहीर झाला आणि शाळांना उन्हाळी सुट्टी लागली. एरव्ही मुलांच्या कलकटाने किलबिलणाऱ्या शाळा सुट्टीमुळे तब्बल दीड महिना मुक्या व अबोल होणार. विद्यार्थ्यांनी सुट्टीत काय करणार, कोठे जाणार याचे नियोजनदेखील केले असणार. आता परीक्षा नाही, अभ्यास नाही, गृहपाठ नाही. नुसती मजा, आता गृहपाठ करण्याची वेळ मुलांच्या पालकांची... हो अगदी बरोबर वाचलेत ! कारण जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा भुवनच्या शिक्षकांनी मुलांच्या पालकांनाच उन्हाळी सुट्टीचा अभ्यास म्हणून गृहपाठ (Homework for Parents) दिला आहे.



या गृहपाठात शाळेतील शिक्षकांनी पालकांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, दहा महिन्यांपासून तुमच्या मुलांची काळजी घेण्यात आम्हाला आनंद झाला. पुढील दोन महिने तुमच्या सोबत घालवले जातील, एक शिक्षक म्हणून आम्ही काही गोष्टी सांगत आहोत त्या पालकांनी त्यांनाच्या मुलांसोबत करण्याचे आवाहन केले आहे. पालकांसाठी सुट्टीचा गृहपाठ या उपक्रमात त्यांच्यासाठी उपयुक्त आणि आनंदी ठरतील अशा काही गोष्टी पालकांनी मुलांसोबत, मुलांसाठी कराव्यात असे सुचवले आहे.

यामध्ये पालकांनी खालील गृहपाठ करायचा आहे.

१. मुलांसोबत किमान दोन वेळा जेवण करा. त्यांना शेतकऱ्यांचे महत्त्व आणि त्यांच्या मेहनती बद्दल सांगा. आणि त्यांना अन्न वाया घालवू नका असे सांगा.

२. जेवल्यानंतर त्यांना स्वतःची ताटे धुवू द्या. अशा कामांतून मुलांना मेहनतीची किंमत कळेल.

३. त्यांना तुमच्याबरोबर स्वयंपाक करण्यास मदत करू द्या. त्यांच्यासाठी भाज्या निवडणे किवा सलाड तयार करणे अशी कामे करू द्या.

४. शेजारांच्या घरी मदतीसाठी येत-जात राहण्यास सांगा. त्यांच्याबदल आदर व आपुलकी बाळगण्यास सांगा.

५. मुलांशी जास्तीतजास्त बोला त्यांची आवड-निवड, मित्र-मैत्रिणी, याविषयी अधिक जाणून घ्या आणि त्यांच्या जवळ रहा.

६. मुलांना आजी-आजोबांच्या सोबत ठेवा, त्यांना मुलांमध्ये मिसळू द्या. त्यांच्या सोबत वेळ घालवू द्या. त्यांचे प्रेम आणि भावनिक आधार तुमच्या मुलांसाठी खूप महत्त्वाचा आहे.

७. फिरायला गेल्यास किंवा कार्यक्रमाप्रसंगी मुलांसोबत फोटो काढा.

८. त्यांना तुमच्या कामाच्या ठिकाणी घेऊन जा जेणेकरून तुम्ही कुटंबासाठी किती मेहनत करता हे त्यांना समजेल.

९. त्यांच्यासोबत स्थानिक सण साजरे करा, किंवा स्थानिक बाजारपेठेत सोबत न्यायला विसरू नका.

१०. बाग, फुलझाडे कुंड्या तयार करण्यासाठी मदत घ्या. तुमच्या मुलांना बिया पेरण्यास, झाडे लावण्यास प्रवृत्त करा. मुलाच्या विकासासाठी ही कृती देखील महत्त्वाची आहे.

११. मुलांना तुमचे बालपण आणि कौटुंबिक इतिहास सांगा.

१२. तुमच्या मुलांना बाहेर जाऊन खेळू द्या, त्यांना दुखापत होईल याची भीती घालू नका. त्यांना माखू द्या. अधूनमधून पडणे आणि वेदना सहन करणे भविष्यातील आव्हाने स्विकारण्यासाठी चांगले आहे.

१३. सोफा कुशनसारखे आरामदायी जीवन तुमच्या मुलांना आळशी बनवेल, सुट्टीत नुसते लोळून देऊ नका. कामात व्यस्त ठेवा.

१४. त्याना कुत्रा, मांजर, पक्षी किंवा मासे असे कोणतेही पाळीव प्राणी पाळू द्या.

१५. त्यांना त्यांच्या आवडीची काही गाणी, लोकगीते गायला, नाचायला व वाजवायला शिकवा.

१६. तुमच्या मुलांसाठी रंगीबेरंगी चित्रांसह काही कथा पुस्तके वाचनासाठी आणून द्या.

१७. तुमच्या मुलांना टीव्ही, मोबाईल फोन, कॉम्प्यूटर आणि इलेक्टॉनिक गॅझेट्सपासून दूर ठेवा. त्यांना खेळ खेळू द्या.

१८. रांगोळी, चित्रकला, सुंदर हस्ताक्षर या सारखे छंद किंवा कला जोपासण्यास मदत करा.

१९. त्यांना चॉकलेट, जेली, क्रीम, केक, चिप्स, बाजारातील पेये आणि बेकरी उत्पादने आणि तळलेले पदार्थ देणे टाळा.

२०. तुमच्या मुलांच्या डोळ्यात पहा आणि तुम्हाला अशी अद्भुत भेट दिल्याबद्दल देवाचे आभार माना. आतापासून येत्या काही वर्षांत ते नवीन उंचीवर असतील. पालक म्हणून तुम्ही तुमचा वेळ तुमच्या मुलांना देणे महत्त्वाचे आहे.

२१.या गृहपाठामध्ये लिहिलेला प्रत्येक शब्द आपल्याला सांगतो की जेव्हा आपण लहान होतो तेव्हा यासर्व गोष्टी आपल्या जीवनशैलीचा एक भाग होत्या ज्याने आपण मोठे झालो, परंतु आज आपली मुले या सर्व गोष्टीपासून दूर आहेत, त्यांना त्या मिळू द्या ज्यामुळे आपण स्वतःही त्यांच्यासोबत आनंदी असू.

जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा भुवन या शाळेने राबवलेल्या "पालकांसाठी सुट्टीचा गृहपाठ" या उपक्रमाचे पालकांकडून स्वागत होत असून आम्ही हा गृहपाठ पूर्ण करण्याचा प्रयत्न करू असा विश्वास दिला आहे. या उपक्रमाचे नियोजन केंद्रप्रमुख मा. श्री. गुरुनाथ घुडे सर, शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. बाळकृष्ण गायकवाड सर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाशिक्षक राजाराम सोंगाळ सर, बाळकृष्ण इसामे सर, संतोष जामघरे सर, सौ. जयश्री शेलवले मॅडम, व . दिलीप खाटेघरे गुरुजी यांनी राबविला आहे. आणि सर्व पालकांनी या गृहपाठाचे चांगले अभिप्राय येतील अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# 'रमेशआण्णा जगताप'!

## राजकीय जीवनाच्या पलीकडे 'मैत्री' जपणारं नेतृत्व !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अकोले :** प्रथमतः आदरणीय रमेशआण्णा जगताप यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. आमच्या देशमुख परिवाराला राजकारण - समाजकारण - नातेवाईक विरहित एक परिवार म्हणून जोडलेल्यांपैकी योगी केशवबाबा चौधरी,प्राचार्य एस.झेड.देशमुखसर आणि रमेशआण्णा जगताप यांचा उल्लेख करावा लागेल कारण माझे वडील अगस्ती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे चेअरमन तसेच अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे संचालक अशोकराव देशमुख(आण्णा) हे समाजकारण - राजकारण करत असतांना या वरील तीघांचीही आमच्या एकत्र कुटुंबात सलोखा राहण्यासाठी तसेच आर्थिक सुधारणेसाठी मोलाचे मार्गदर्शन राहिलेले आहे.मला जसं आठवतंय तसं रमेशआण्णा हे नाव मी आमच्या परिवारात ऐकतोय,आमचे आण्णा आणि रमेशआण्णा यांची मैत्री कॉलेज जीवनातील.मैदानी खेळात तालुक्यात एक उत्कृष्ट खेळाडू म्हणून त्यावेळेस रमेशआण्णांचे चांगले नाव होते,पुढे दोन्ही आण्णांनी जे.डी. आंबरे पाटील,झुंबरदादा मालुंजकर,दशरथ सावंतसाहेब,रंगनाथमामा मालुंजकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी चळवळीत भाग घेत मीटर हटाव,दुध दरवाढ,कांदा दरवाढ,पेट्रोल डिझेल भाववाढ, वीज पुरवठा सुरळीत राहण्यासाठी एक ना अनेक आंदोलने केली.रमेशआण्णांनी शेतीमध्ये देखील डाळिंब,आंबे अशा प्रकारच्या



फळबागांची तसेच इतर शेती पिकांची प्रायोगिक तत्वावर शेती करून आधुनिक शेती चांगल्या पद्धतीने फुलवली,रमेशआण्णांचा स्वभाव मुळातच शांत - संयमी, भाषणात आक्रमकता जरी नसली तरी कुठल्याही कार्यक्रमात,सभेत प्रास्ताविक, सूत्रसंचलन, भाषण करतेवेळी मुद्देसूदपणा,व्यवस्थित मांडणीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करण्याची कला त्यांच्याकडे होती आणि आजही आहे.आंबेडकरी चळवळीत काम करत असतांनी रमेशआण्णांनी माझ्या माहितीप्रमाणे अकोल्यात प्रथमच कारवाडी येथे आण्णांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज,शाहू - फुले - आंबेडकर अशी संयुक्त जयंतीची सुरुवात केली आणि अनेक वर्षांपासून ती सर्व समाज बांधवानच्या उपस्थितीत साजरी केली जाते.आमची आज्जी रमेशआण्णांना मुलगाच मानत होती,आमच्या आण्णांचा स्वभाव शिस्तीचा - कडक असल्यामुळे आण्णा जरासे चिडलेले असतील आणि आज्जीला त्यांना काही सांगायच्या असेल तर आज्जी रमेशआण्णांना बोलावून त्यांना सांगायला लावायची आणि आण्णा त्यांचं ऐकायचे देखील असं एक जिव्हाळ्याचं नातं रमेशआण्णा आणि आमच्या कुटुंबात राहिलेलं आहे आणि विशेषकरून आजही ते तसच टिकून आहे.आजही रमेशआण्णा हे कॉंग्रेस पार्टीत व ADCC बँकेचे संचालक मधुभाऊ नवले यांच्या नेतृत्वाखाली बुवासाहेब नवले पतसंस्थेत व्हा.चेअरमन म्हणून काम पाहतात तर आमचे वडील अशोकआण्णा देशमुख हे आमच्या कुटुंबाचे मार्गदर्शक अगस्ती कारखान्याचे चेअरमन तसेच ADCC बँकेचे माजी चेअरमन विद्यमान संचालक सीताराम पाटील गायकरसाहेब तसेच कार्यसम्राट आमदार डॉ किरणजी लहामटेसाहेब यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीत तसेच अगस्ती ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेत चेअरमन तर कारखान्यात संचालक म्हणून काम पाहतात,पार्टी वेगळी,नेतृत्व वेगळं,पक्ष विचारधारा वेगळी तरीही आजही दोनीही आण्णांच्या मैत्रीत तसूभरही फरक जाणवत नाही.रमेशआण्णांनी तालुक्यात पंचायत समिती सदस्य म्हणून काम पहिले तसेच अकोले तालुका ऐज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारणीचे सदस्य व बुवासाहेब नवले पतसंस्थेचे व्हा.चेअरमन अशा तालुका स्तरावरील विविध संस्थेमध्ये काम करत असतांनी अनेक लोकांची कामे मार्गी लावली. अशा या बहुआयामी,शांत,संयमी सामाजिक बांधिलकी असलेल्या नेत्याला माझ्याकडून व माझ्या देशमुख परिवाराकडून वाढदिवसाच्या खुप खुप शुभेच्छा.



# धसई प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड दि.२ :** नँशनल आवार्ड ते जिल्हाभरीत ९४% ईतके उत्तम सेवेचे प्रमाणपत्र लाभलेल्या मुरबाड तालुक्यातील धसई आरोग्य केंद्राला १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री .एकनाथ शिंदे यांचे हस्ते तालुका आरोग्य अधिकारी डाँ, श्रीधर बनसोडे प्राथमिक आरोग्य धसई वैद्यकिय अधिकारी नंदकुमार गोरडे व कर्मचारी वर्गाला उत्कृष्ट काम करून राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता आश्वासन मानके (NQAS) प्रमाणपत्र मिळविल्याचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे, विशेष म्हणजे कोरोना महामारीत तालुका आरोग्यअधिकार व संपुर्ण आरोग्य विभागाने विविध उपक्रम राबवून जनजागृती मोहिम व कोरोना वर मात करण्यासाठी योगदान दिले होते.

## कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण

मा. शरदचंद्रजी पवार मुख्य बाजार आवार, एन टाईप इमारत,
१ ला मजला, कल्याण - शिळ रोड, कल्याण (प), जि. ठाणे ४२१ ३०१
दुरध्वनी क्रमांक (०२५१) २९७०३१६ e mail :- apmckalyan@rediffmail.com

### बांधकाम विभाग

-: व्दितीय फेर ई निविदा सुचना :-

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती, कल्याण अन्नधान्य बाजार विभाग-२ येथे ६३० के.व्ही. क्षमतेचा विद्युत ट्रान्सफॉर्मर उभारणे करीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून "बी-१" नमुन्यात कामाची व्दितीय फेर ई निविदा मागवित आहे.

व्दितीय फेर ई निविदा फॉर्म व निविदेबाबतच्या सर्व अटि-शर्तीची संपूर्ण माहिती महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders. gov.in या संकेतस्थळावर दि. ०२/०५/२०२५ ते ०६/०५/२०२५ रोजी सायंकाळी ५,०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. भरण्यात आलेल्या व्दितीय फेर ई निविदा ह्या दि. ०६/०५/२०२५ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत वरिल संकेतस्थळावर अपलोड करण्यात याव्यात. प्राप्त व्दितीय फेर ई निविदा दि. ०८/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येतील.

कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व व्दितीय फेर ई निविदा रद्द करण्याचा अधिकार प्रशासक यांनी राखून ठेवला आहे. याबद्दलचा निर्णय अंतिम व निविदाधारकांना बंधनकारक राहील.

व्दितीय फेर ई निविदेबाबतची अधिक माहिती www.mahatenders.gov.in www.apmckalyan.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

शिक्का


सही/-
सचिव
(संजय जी. एगडे)
कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण

सही/-
(डॉ. किशोर नारायणराव माडे)
प्रशासक
कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण

*जावक क्रमांक : कृऊबास/विद्युत ट्रान्सफॉर्मर/व्दितीय फेर ई-निविदा/१४२/२०२५ दि. ३०/०४/२०२५
*जाहिरत आदेश : कृउबास सुचना /प्रसिध्दी १४३/२०२५ दि. ३०/०४/२०२५




# जिल्हा परिषद शाळा संगम येथे विकासकामांचे लोकार्पण



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड दि.२-** मुरबाड तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्र शाळा संगम येथे मिलान लॅबोरेटरी व रोटरी क्लब ठाणे नॉर्थ यांच्या विशेष सहकार्याने शाळेतील इमारतीचे रंगकाम, शेड, नवीन किचन शेड, तसेच इतर भौतिक सुविधा मोफत देण्यात आल्याने या विकास कामांचा लोकार्पण सोहळा मिलान लॅबोरेटरी लि. चे सर्वेसर्वा स्व. उपेंद्र देशपांडे यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून ३० एप्रिल रोजी मिलान लॅबोरेटरीच्या अध्यक्षा शर्वरी देशपांडे, किर्ती चौधरी व रोटरी क्लब ठाणे नॉर्थच्या अध्यक्षा मेघा जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या वेळी प्रमुख पाहुणे सुनील सोमन रोटरी क्लबचे अमोल नाळे, शाळेच्या मुख्याध्यापिका मेघा देशमुख, वरिष्ठ शिक्षक तानाजी माळी, सहशिक्षक महेश शिंदे केंद्र प्रतिनिधी इसामे, पाटील शिक्षक उपस्थित होते. शासनाच्या तुटपुंज्या निधीमध्ये शाळेतील इतर आवश्यक कामे होत नसल्याने सामजिक बांधिलकी म्हणून काही संस्था पुढे सरसावून मदत करत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिकण्याची प्रेरणा मिळते. असे सामाजिक कार्यकर्ते दिनेश जाधव यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com





# ठाणे भारत स्काऊट्स गाईडस जिल्हा कार्यालयात महाराष्ट्र दिन साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त राज्यभर मोठ्या उत्साहात महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला. याचे औचित्य साधून दि.1 मे 2025 रोजी ठाणे भारत स्काऊट्स आणि गाईडस जिल्हा कार्यालय, ठाणे येथे ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा कार्यालयाचे जिल्हा मुख्य आयुक्त तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.) बाळासाहेब राक्षे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा आयुक्त गाईड तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) ललिता दहितूले यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी जिल्हा संस्थेचे जिल्हा सचिव देवदत्त शिंदे, माजी अध्यक्ष तथा सहा. जिल्हा आयुक्त स्काऊट, केदार जोशी, प्रशिक्षण आयुक्त स्काऊट केशव चौधरी, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड पुष्पा जगताप, स्काऊट विभाग लीडर ट्रेनर तथा जिल्हा मुख्यालय आयुक्त स्काऊट जीवन मटके, गाईड विभाग लीडर ट्रेनर अलका पवार, जिल्हा कार्यालयाचे जिल्हा संघटक स्काऊट किरण लहाने, जिल्हा संघटक गाईड हेमांगी पाटील, कार्यालयाचे वरिष्ठ लिपिक संदिप घुसिंगे, कनिष्ठ लिपिक ज्योती इंगळे, नाईक विठ्ठल शिरोसे, शिपाई शिवाजी पार्टे यांनी उपस्थित राहून राष्ट्र ध्वजास मानवंदना.

# उल्हास नदीपात्रात हजारो ब्रास मातीचा भराव

## पर्यावरण प्रेमी संतप्त

### कठोर कारवाईची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण: उल्हास नदीपात्रात सांडपाणी प्रक्रिया न करता सोडले जात असल्याने नदी प्रदूषित होत असतानाच आता बदलापूरनजीक उल्हास नदीपात्रात हजारो ब्रास मातीचा भराव टाकून नदीपात्र बुजवून टाकण्यात येत असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली. उल्हास नदीचे हे नवे मारेकरी कोण, असा संतप्त सवाल नदी प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या पर्यावरणप्रेमी कार्यकर्त्यांनी उपस्थित केला. याकडे महसूल खात्याचे दुर्लक्ष होत असून नदीचे पात्र बुजविणाऱ्यांच्या विरोधात कठोर कारवाईची मागणी करण्यात आली. बदलापूरनजीक उल्हास नदीपात्रात हजारो ब्रास मातीचा भराव टाकून नदीचा प्रवाह रोखला जात असल्याच्या विरोधात बदलापुरातील महिला कार्यकर्त्या संगीता चेंदवणकर यांनी धरणे आंदोलन सुरु केले. उल्हास नदीवर काही दिवसांपासून अनधिकृत सिमेंट भिंत बांधली जात आहे. नदीपात्रात केला जाणारा मातीचा भराव आणि सिमेंटची बांधली जाणारी भिंत या गोष्टी तहसीलदार आणि महसूल खात्याच्या लक्षात कशा येत नाहीत, असा सवाल चेंदवणकर यांनी उपस्थित केला. प्रशासनाकडे तक्रार केल्यावर थातूरमातूर कारवाई केली जाते. त्यानंतर पुन्हा ये रे माझ्या मागल्या अशी स्थिती असते, असे त्यांचे म्हणणे आहे. उल्हास नदी वाचविण्यासाठी प्रयत्नशील 'मी कल्याणकर' संस्थेचे प्रमुख नितीन निकम यांच्यासह माजी नगरसेवक उमेश बोरगावकर यांनी ज्या ठिकाणी नदीपात्रात मातीचा भराव टाकला जात आहे. त्या ठिकाणची प्रत्यक्ष पाहणी केली. प्रशासनाची भेट घेऊन कारवाईची मागणी करण्यात येणार आहे. दखल न घेतल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल करू, असे निकम म्हणाले.



### वालधुनी नदीपात्रातही अतिक्रमण

**वालधुनी नदी ही सगळ्यात जास्त प्रदूषित आहे. नदीपात्रात वालथुनी परिसरात बिल्डरांनी अतिक्रमण करून बडे बिझनेस सेंटर, गृहसंकुले उभारली आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अतिक्रमण सुरू असताना तक्रारी केल्या. त्याची दखल जिल्हाधिकारी कार्यालयाने घेतली नाही. विठ्ठलवाडी स्टेशनसमोर वालधुनी नदीपात्रात केडीएमसीकडून बीओटी तत्त्वावर बिझनेस सेंटरचे काम केले जात आहे.**

# आदिवासी, जंगल जनावर वाचायला हवे

## - डॉ. प्रकाश आमटे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथः आदिवासी भूकबळीचा शिकार होता कामा नये म्हणून आदिवासी भागात जंगल, जनावर आणि आदिवासी यांना संरक्षण आवश्यक आहे. त्यासाठी सर्वांचा सहभाग महत्वाचा आहे, असे आवाहन पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांनी अंबरनाथमध्ये केले. अंबरनाथ पूर्व येथे महालक्ष्मीनगरात डॉ. मानकर यांचे शिवशाही हॉस्पिटलचे उद्घाटन प्रकाश आमटे यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी आमटे म्हणाले की, आम्ही चंद्रपूर सारख्या आदिवासी विभागात निरपेक्ष भावनेने कुष्ठरोगी आणि आदिवासी यांची सेवा करत आहोत. या वेळी अंबरनाथचे प्रसिद्ध डॉक्टर एस ही देशपांडे, डॉ. गणेश राठोड (कोचिड योद्धा), डॉ मुंदडा सर, डॉ नरेंद्र शेट्टी (त्वचा रोग तज्ञ) डॉ विजय पिल्ले (हृदयरोग तज्ञ) डी हरीश लॅपसिया (बालरोग तज्ञ) यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ अविनाश गव्हाणे (स्वी रोग तज्ञ यतीन भिसे (नेत्ररोग तज्ञ) चंद्रकांत साळवे (बालरोग तज्ञ ) डॉ सुजाता मानकामे, डॉ उषा माहेश्वरी, डॉ प्रमोद बेलापुरे, डॉ संदीप साठे, डॉ राहुल चौधरी, डॉ प्रतीक्षा गायकवाड आदींना डॉ प्रकाश आमटे, डॉ मंदाकिनी आमटे यांच्या हस्ते सन्मानित केले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# पुस्तकांसाठी घर बांधणारे आणि संकल्प भूमी तयार करणारे व्यक्ती म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## - उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : चैत्यभूमी माहीत होती दीक्षाभूमी माहीत होती पण जेव्हा मी अभ्यास करू लागले तेव्हा संकल्प भूमी ही बाब मला कळाली काय आहे संकल्प भूमी मग मी त्याचा अभ्यास केला तेव्हा सुद्धा एवढ्या काही गोष्टी लक्षात आल्या. त्याचबरोबर पुस्तकासाठी राजगृह घर बांधणारे एकमेव डॉ.बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत त्याच ठिकाणी त्यांनी भारतीय संविधान लिहिण्याच काम केले. असे प्रतिपादन प्रमुख वक्त्या अंजली धानोरकर उपजिल्हाधिकारी छत्रपती संभाजी नगर यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका बहुजन कर्मचारी परिवर्तन संस्था आयोजित छत्रपती शिवाजी महाराज क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने त्या बोलत होत्या. यावेळी विचार मंचकावर उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष उप आयुक्त रमेश मिसाळ, तहसीलदार सचिन शेजाळ, सहा. आयुक्त प्रीती गाडे, माजी महापौर रमेश जाधव, संस्था अध्यक्ष चंद्रकांत पोळ, दत्ता गिरी, जयंती समिती अध्यक्ष संतोष हेरोडे इत्यादीसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सलग दोन दिवस विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात होते. यानिमित्ताने मंगळवारी महापालिका मुख्यालयाच्या आवारात आरोग्य शिबिर चित्रप्रदर्शन संविधान कला दालन मोफत चष्मा वाटप आणि रक्तदान शिबिर अशा विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरामध्ये नेत्र तपासणी रक्तदान शिबिर ब्लडप्रेशर डायबिटीस ची तपासणी करण्यात आली. त्याच बरोबर भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त चित्रप्रदर्शन करून संविधानाविषयी माहिती देण्यात आली. तसेच आचार्य अत्रे रंगमंदिर या ठिकाणी देखील विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाप्रसंगी लोकशाहीर विठ्ठल उमप यांना आंबेडकरी शाहीराचा पुरस्कार देण्यात आला असून संत गाडगे महाराज स्वच्छता कर्मचारी पुरस्कार महापालिका कर्मचारी जाधव यांना देण्यात आला तर आंबेडकर चळवळीतील अधिकारी कर्मचारी पुरस्कार विलास कांबळे यांना संस्थेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे मानपत्र व रोख रक्कम आणि स्मृतिचिन्ह देऊन देण्यात गौरविण्यात आले.

सांस्कृतिक कार्यक्रम देशभक्तीपर राष्ट्रीय महापुरुषांच्या जीवन कार्यावर नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. तसेच प्रबोधनात्मक कार्यक्रम सादरकर्ते शितल भंडारे आणि संच मुंबई यांचा प्रबोधन कला मंच शाहिरी जलसा विवेकी विचारांचा जागर हा कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी युवराज गाडे, बाबासाहेब काकडे, डॉ.संदीप पगारे, भाऊराव पंडीत, संजय ओंकारेश्वर, प्रवीण कांबळे, नवनीत गायकवाड, विलास कांबळे, हरिचंद्र जाधव लक्ष्मण मोते, नागेश टोळ, सुनील अंबाडे, भूषण कोकणे, संजीवनी पाटकर, पौर्णिमा कांबळे, अनिता शिंदे, सिमा आठवले, इत्यादींनी परिश्रम घेतले तर सूत्रसंचालन समाधान मोरे यांनी केले तर सर्व उपस्थितांचे विजय सरकटे यांनी आभार मानले.


# कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती,कल्याण जि. ठाणे

मा. शरदचंद्रजी पवार मुख्य बाजार आवार, एन टाईप इमारत, १ ला मजला,
कल्याण- शिळ रोड, कल्याण (प), जि. ठाणे ४२१ ३०१
दुरध्वनी क्रमांक (०२५१) २९७०३१६ ,e mail :- apmckalyan@rediffmail.com

## बांधकाम विभाग
## द्वितीय फेर ई निविदा सुचना

कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती, कल्याण भाजीपाला बाजार विभाग-२ येथे ६३० के.व्ही . क्षमतेचा विद्युत ट्रान्सफॉर्मर उभारणे करीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून "बी-१" नमुन्यात कामाची ई निविदा मागवित आहे.

द्वितीय फेर ई- निविदा फॉर्म व निविदेबाबतच्या सर्व अटि-शर्तींची संपूर्ण माहिती महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०२/०५/२०२५ ते ०६/०५/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. भरण्यात आलेल्या द्वितीय फेर ई-निविदा ह्या दि. ०६/०५/२०२५ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत वरिल संकेतस्थळावर अपलोड करण्यात याव्यात. द्वितीय प्राप्त फेर ई-निविदा दि. ०८/०५/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता शक्य झाल्यास उपडण्यात येतील.

कोणत्याही कारणास्तव एक किंवा सर्व द्वितीय फेर ई-निविदा रद्द करण्याचा अधिकार प्रशासक यांनी राखून ठेवला आहे. याबद्दलचा निर्णय अंतिम व निविदाधारकांना बंधनकारक राहील.

द्वितीय फेर ई-निविदेबाबतची अधिक माहिती www.mahatenders.gov.in व www.apmckalyan.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही
(संजय जी. एगडे)
सचिव
कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण

सही-
(डॉ. किशोर नारायणराव मांडे )
प्रशासक
कल्याण कृषि उत्पन्न बाजार समिती, कल्याण

जावक क्रमांक : कृऊबास/विद्युत ट्रान्सफॉर्मर/व्दितीय फेर ई-निविदा १४०/२०२५
जाहिरात आदेश : कृउबास/सूचना/प्रसिद्धी/१४३/२०२५
दि.३०/०४/२०२५


# ३८ वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतर संगीता म्हात्रे सेवानिवृत्त




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : आपल्या सेवेची सुरूवात पेण एज्युकेशन सोसायटीच्या कै. पू. न.गोडसे विद्यामंदिर वरसई या प्रशालेत सप्टेंबर १९८५ मध्ये केली.विशेष म्हणजे जून मध्ये डी.एड.निकालानंतर दोन महिन्यात नोकरी मिळणे कमी लोकांच्या नशिबी असते ते भाग्य संगिता चंद्रकांत म्हात्रे मॅडम यांना लाभले.डावरे ते तांबडशेत तीन किलोमीटर आणि वरसई फाटा ते वरसई तीन किलोमिटर असा सहा किलोमीटर रस्त्याने रोज पायी प्रवास करत होत्या कारण त्याकाळात मोजक्या गाड्या असायच्या.अशा बिकट परिस्थितीत त्यांचे पती चंद्रकांत म्हात्रे सरांचे खूप मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

त्यांनी सुरुवातीच्या काळातखडतर प्रवास करत सेवा केली.त्यानंतर वडखळ जयकिसान विद्यामंदिर येथे त्यांनी काही वर्ष सेवा केली. त्यानंतर सुमारे १७ वर्ष प्रायव्हेट हायस्कूल पेण आणि १८ वर्ष म. ना.नेने कन्या शाळा पेण येथे प्रदीर्घ सेवा करण्याची संधी संस्थेने दिली..ही यांच्या कामाची पोचपावती होती.विशेष म्हणजे आपली सेवानिवृत्ती वरसई विद्यालयात होणे हा एक योगायोग आहे.फार कमी शिक्षकांना लाभते ते त्यांना लाभले.त्यांनी ३८ वर्ष ८ महिने अशी प्रदीर्घ सेवा केली. त्याबद्दल त्यांनी आपल्या भाषणात संस्था प्रमुखांचे व सर्व संचालक मंडळाचे ऋण व्यक्त केले.

मुख्याध्यापक मुरूमकर सर,आणि त्यांच्या सर्व सेवकांनी त्यांच्या मनमिळाऊ स्वभाव,कामातील प्रामाणिक ,निस्वार्थी ,निगर्वी या गुणविषयी कौतुक केले.रजा शिल्लक असताना सुद्धा त्या अखेरच्या दिवसा पर्यंत शाळेत जात होत्या हे वाखाणण्याजोगे आहे.आपली नेहमीच शाळेला आठवण राहावी म्हणून त्यांनी विद्येची देवता सरस्वती मूर्ती प्रशालेत भेट म्हणून दिली..संगीत हा त्यांच्या आवडीचा विषय आणि भविष्यात अखेर पर्यंत जोपासून आपले निवृत्ती नंतरचे जीवन आनंदाने सुखकर जावे यासाठी त्यांनी क्लास मध्ये प्रवेश घेतला आहे.मितभाषी, मनमिळावू, कामातील प्रामाणिकपणा ,वरिष्ठाविषयी आदर, विद्यार्थी प्रिय शिक्षिका अशी त्यांची ओळख आहे. या प्रदीर्घ सेवेत डॉक्टर ,इंजिनिअर,मोठ्या, छोट्या कंपनीत,बँकेत उच्च पदावर आहेत काही पत्रकार त्यांचे विद्यार्थी आहेत..या सेवा निवृत्ती प्रसंगी त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते..

# टिळक चौकात शिवसेनेच्या वतीने पकिस्तानचा निषेध

## पहेलगाम येथील अतिरेकी हल्यातील शहिदांना वाहिली श्रद्धांजली




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिमेतील टिळक चौक शिवसेना शाखेच्या वतीने गुरूवारी पहेलगाम येथील अतिरेकी हल्यात शहीद घटना प्रकरणी पाकिस्तानचा निषेध करण्यात आला. तर या हल्ल्यात शहीद झालेल्यांना श्रद्धांजली देखील वाहण्यात आली.

पहेलगाम येथील गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या मोने, लेले, जोशी यांचे नातेवाईक कल्याणात असून गुरुवारी दहावाच्या विधी असल्यामुळे त्यांना श्रद्धांजली वाहण्याचा संध्याकाळी शिवसेना कार्यालय, महालक्ष्मी मंदिरा शेजारी, टिळक चौक पारनाका रोड येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी मोठ्या संख्येने नागरिक महिला वर्ग यासमयी उपस्थित होता. पहेलगाम येथील अतिरेकी हल्यात शहीद घटना प्रकरणी पाकिस्तानचा निषेध करीत देशाच्या पंतप्रधान यांच्या पाठीमागे देशवासिय असून पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी खंबीरपणे आपण उभे राहिले पाहिजे, देशहितासाठी एकत्र आले पाहिजे असे प्रतिपादन शिवसेना उपशहर प्रमुख नितीन माने यांनी केले. या प्रसंगी शिवसेना महिला आघाडी पदाधिकारी नेत्रा उगले, माजी महापौर वैजंयती घोलप, लता पाटील आदींसह शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर, मुंबई येथे आयोजित 'वेव्हज 2025' कार्यक्रम येथे महाराष्ट्र शासनाचे मुखपत्र असलेल्या 'लोकराज्य' आणि 'महाराष्ट्र अहेड'च्या वेव्हज विशेषांकाचे प्रकाशन केले.



जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट च्या हायस्कूल कल्याण येथे एक मे 2025 महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या व औचित्य साधून स्पोर्टस अकॅडमी चे उद्घाटन करण्यात आले .यामध्ये वेगवेगळ्या 24 प्रकारातले स्पोर्ट्स असून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबत शारीरिक विकास पण साधला जाणार आहे सर्व विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन ("B"Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2025-2026
B.COM. BACHELOR OF COMMERCE
M.COM. MASTER OF COMMERCE
ADVANCED ACCOUNTANCY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558


# भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयात अत्याधुनिक डायलिसिस युनिटचे लोकार्पण




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधत, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयात नव्या अत्याधुनिक डायलिसिस युनिटचे लोकार्पण महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ.शर्मा (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त प्रसाद शिंगटे, शहर अभियंता दीपक खांबित, महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रमोद पडवळ,इतर मनपा अधिकारी, रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका, 'मेकिंग द डिफरन्स' या संस्थेचे दिपक विश्वकर्मा तर पराग पारीख फायनान्शियल ॲडव्हायझरी सर्व्हिसेस (PPFAS) चे शैलेश पांडे आणि पत्रकार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेकिंग द डिफरन्स' या संस्थेच्या आणि PPFAS च्या सहकार्याने इंदिरा गांधी रुग्णालयात ५ नवीन डायलिसिस मशिन्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यापूर्वी येथे ८ मशिन्स कार्यरत होत्या. आता नव्याने जोडलेल्या ५ मशिन्समुळे डायलिसिस उपचारक्षमतेत लक्षणीय वाढ होणार असून, अधिक रुग्णांना वेळेवर व दर्जेदार उपचार देणे शक्य होणार आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू रुग्णांसाठी ही आरोग्यसेवा एक मोठा दिलासा ठरणार आहे . या नव्या डायलिसिस युनिटमुळे मिरा भाईंदर शहरातील डायलिसिस रुग्णांना अधिक सुलभ, वेगवान आणि उत्तम उपचार मिळणार आहेत ज्यामुळे त्यांच्या आयुष्यातील काही वर्ष नक्कीच वाढतील जे त्यांच्या कुटुंबासाठी खूप महत्वाचे आहे अशा भावना यावेळी मा.आयुक्त यांनी व्यक्त केल्या .तसेच मेकिंग द डिफरन्स आणि पराग पारीख फायनान्शिअल ॲडव्हायझरी सर्विसेसचे आभार मानत यापुढे हि अशाप्रकारे मदत करण्याचे आवाहन केले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका नागरिकांसाठी वैद्यकीय सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे, आणि हे नवीन डायलिसिस युनिट त्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन ("B"Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2025-2026
B.A.F. ACCOUNT & FINANCE
B.M.S. BACHELOR OF MANAGEMENT STUDIES
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558


'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024